# यावल महाविद्यालयात महापरिनिर्वाण दिन साजरा

यावल (वार्ताहर) कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त विनम्र अभिवादन कार्यक्रम साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. संध्या सोनवणे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पित करून विनम्र अभिवादन केले . तसेच उपप्राचार्य प्रा. एम.डी. खैरनार यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची मांडणी केली तसेच आभार उपप्राचार्य प्रा. ए. पी. पाटील यांनी मानले.

महाविद्यालयातील उपप्राचार्य प्रा. संजय पाटील, सर्व प्राध्यापक वर्ग व शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रार्थना घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेला विनम्र अभिवादन केले.





अवतीभवती

यावल : महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करताना प्राचार्या डॉ. संध्या सोनवणे व प्राध्यापक.

**यावल महाविद्यालयात महापरिनिर्वाण दिन**

**यावल :** येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात महापरिनिर्वाण दिनानिमित्त कार्यक्रम झाला. प्राचार्या डॉ. संध्या सोनवणे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेचे पूजन केले. उपप्राचार्य प्रा. एम. डी. खैरनार यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची मांडणी केली. उपप्राचार्य प्रा. संजय पाटील, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी प्रार्थना घेऊन डॉ. आंबेडकरांच्या प्रतिमेला अभिवादन केले. उपप्राचार्य प्रा. ए. पी. पाटील यांनी आभार मानले.